अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

# स्वच्छतेचे अनेक अर्थ आणि अनेक संदर्भ

एकूणच देशातील स्वच्छतेचा प्रश्न पुन्हा एकदा जोरदारपणे चर्चेत आला आहे. परंतु स्वच्छता किंवा कचरा याचे अनेक अर्थ आणि संदर्भ निघतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात थेट प्रसाधनगृहांचा विषय मांडल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्या. देशाच्या ग्रामीण भागातील महिलांना शौचालये नसल्याने त्यांची कशी अडचण होते किंवा शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे नसल्याने आपण विद्यार्थिनींकडे कसे दुर्लक्ष करतो हे सांगण्याचा प्रयत्न मोदींनी केला. यासाठी शाळांमध्ये विद्यार्थिनींसाठी प्रसाधनगृहे बांधण्याच्या योजनेला सरकारने अग्रक्रम दिला असल्याचे जाहीर केले. तर सगळ्या देशात मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता असल्याने भारत पर्यटनाच्या स्पर्धेतही मागे पडतो.असे सांगून मोदींनी स्वच्छतेचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला, खरे तर स्वच्छता कोणाला नकोय. स्वच्छ, सुंदर शरीर परमेश्वराने दिले आहे ते नीट नेटके ठेवण्याचा प्रयत्न माणूस करतोच गावाकडचा शेतकरी अगदी आपल्या गाईबैलांनासुध्दा महिना पंधरा दिवसांतून स्वच्छ करीत असतो. श्रीमंतांना स्वच्छतेचे तर वेडच असते म्हणा. दिवसातून दोन वेळा आंघोळ तीदेखील शॉवरखाली किंवा शेकडो लीटर पाण्याच्या भरलेल्या टबमधून केली जाते. आपला आजुबाजूचा परिसर स्वच्छ राहावा, असेही अगदी सामान्य माणसालाही वाटते. मोदींनी ग्रामीण भागात प्रसाधनगृहे नाहीत अशी तक्रार केली. पण तशी ती शहरातही पुरेशा प्रमाणात नाहीत. मुंबईच्या सर्व रेल्वेमार्गाच्या आजूबाजूला होणारी अस्वच्छता काय किंवा कोलकाता काय मोदींच्या अहमदाबाद स्टेशन परिसरात असणारी अस्वच्छता सारख्याच स्वरुपाची आहे. ही कमी व्हावी याबाबत कोणाचेही दुमत होणार नाही. परंतु ज्यासाठी काही प्रश्न मोदींनी किंवा ज्यांना ज्यांना स्वच्छता हवी त्या सर्वांनी स्वत:लाच विचारले पाहिजे. एक म्हणजे अस्वच्छता निर्माण होण्याची कारणे काय ती दूर करण्याचा हमखास उपाय कोणता आणि खरे तर याहीपेक्षा मुलभूत आणि महत्त्वाचा प्रश्न म्हणजे अस्वच्छता म्हणजे नेमके काय एकदा जर काय या तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर नीट मिळाले किंवा निदान समजून घेतले तर आधीच्या दोन प्रश्नांची उत्तरे मिळणे सोपे जाईल. कारण शेवटी कोणत्याही समस्येवर काही नाही काही उपाय असतातच. परंतु समस्याच निर्माण होणार नाही किंवा ती अगदी हाताबाहेर जाणार नाही यावर उपाय शोधणे अधिक शहाणपणाचे ठरते. दुर्दैवाने आपल्या देशात समस्या निर्माण झाल्यावर उपाय शोधले जातात. काही वेळा तर एखादी गोष्ट सोय आहे की समस्या आहे याचाही उलगडा होत नाही. मोदींनी शाळांमध्ये मुलींसाठी किंवा ग्रामीण भागात महिलांना भेडसावणाऱ्या प्रसाधनगृहांबाबतच्या समस्येचा अधिक उहापोह केला आणि आपण म्हणजे सरकार आणि समाज यासाठी काही करू शकत नसू तर ते अपमानजनक असल्याचे ते म्हणतात.

## सत्यम, शिवम, सुंदरमचे तत्व

स्वाभाविकपणे समाजाच्यादृष्टीने तितक्याच महत्वाच्या प्रश्नाविषयी थेट पंतप्रधानासारख्या व्यक्तीने स्पष्टपणे बोलणे याला एक वेगळेच महत्व आहे. परंतु अनुभव असा आहे की, आतापर्यंत एकूण स्वच्छतेच्या संदर्भामध्ये अनेक प्रकारच्या सरकारी योजना जाहीर झाल्या. त्यासाठी अंदाजपत्रकांमधून कोट्यवधी रुपयांच्या रकमांची तरतूद झाली. तरीदेखील समाजामध्ये स्वच्छतेचे महत्व रुजवले नसेल तर त्या सगळ्याचा दोष एकट्या समाजाला देता येत नाही आणि जसे सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे स्वच्छता म्हणजे नेमके काय हेदेखील एकदा नीट समजून घेतले पाहिजे. स्वच्छता म्हणजे केवळ केरकचरा दूर करणे. स्वच्छता म्हणजे केवळ प्रसाधनगृहांची स्नानगृहांची निर्मिती करणे एवढापुरताच मर्यादित अर्थ राहत नाही. याशिवाय मनुष्याच्या किंवा समाजाच्या वागण्याबोलण्यामध्ये असलेली व्यवहारामध्ये जाणवणारी अस्वच्छतादेखील तितकीच महत्वाची ठरते. आपण किती प्रिय आणि चांगले बोलतो आपला शब्द कोणाचेही मन दुखावणार नाही याची आपण किती काळजी घेतो संवादामधून साधता येणारी ही सुंदरता आपोआप मनाची स्वच्छता करीत असते. मग या स्वच्छतेला महत्व द्यायचे की नाही. म्हणून स्वच्छतेचे अनेक अर्थ आणि संदर्भ निघू शकतात. याचा संबंध एकूणच समाजाच्या समाजातले सत्य टिकवणारे, समाजातले शिव म्हणजे पवित्रता टिकवणारे आणि समाजाला सुंदर बनवणारे असू शकते. आज अस्वच्छता का आहे कारण सामान्य माणसापासून असामान्यांपर्यंत किंवा समाजकारणापासून ते राजकारण्यांपर्यंत या स्वच्छतेचे मर्म जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाही आणि म्हणून स्वच्छता म्हणजे काय याचे जर आकलन झाले तर अस्वच्छता करायची नाही हे आपोआप घडू शकते. अस्वच्छता मग ती केरकचऱ्याची असो किंवा मनुष्याच्या मनामध्ये दडून बसलेल्या द्वेष, मत्सर, स्वैराचार, व्याभिचार, भ्रष्टाचार या सगळ्यांची असो. ती दूर करायची असेल तर सर्वांनीच सत्य, शिव आणि सुंदर याची कास धरली पाहिजे. सत्य स्वीकारायचे नाही सत्याची अंमलबजावणी करायची नाही. सतत खोटारडेपणाचाच आश्रय घ्यायचा आणि व्यवहारात मात्र किंवा वागणुकीतून पवित्रतेची अपेक्षा करायची. हे शक्य होऊ शकत नाही. आज तर लोकांची अशी ठाम धारणा आहे की, खरे बोलण्याचा जमानाच उरलेला नाही आणि राजकारणी तर भ्रष्टाचाराशिवाय सत्ता राबवू शकत नाही. ही परिस्थिती जर स्वीकारली तर मग अगदी शाळांमध्ये विद्यार्थिनींसाठी किंवा ग्रामीण भागात महिलांसाठी प्रसाधनगृह का नाहीत याचे आपोआप उत्तर मिळेल.

## समस्येचे मूळ कारण

स्वातंत्र्याच्या ६८ वर्षानंतर याच भ्रष्टाचाराचे ,खोटारडेपणाचेस्वार्थीपणाचे थैमान होत राहिले. मोदींनी अगदी लाल किल्ल्यावरच्या राष्ट्राच्यादृष्टीने प्रतिष्ठित अशा समारंभात अस्वच्छतेसारखा अतिशय क्षुल्लक मुद्दा मांडून आपला प्रामाणिकपणा जरूर दाखवला, परंतु त्याची प्रामाणिक उत्तरे ही आजच्या सरकारी धोरणांमध्ये आहे. राजकारण्यांच्या भ्रष्टाचारामध्ये आहे. मनापासून कोणतेही काम करायचे नाही. समाजाचे प्रश्न सोडवायचे नाहीत. मोदी पंतप्रधान झाले आणि अचानक त्यांना या अस्वच्छतेच्या प्रश्नाने अस्वस्थ केले. असेही समजण्याचे कारण नाही. त्यांच्या कल्पनेतली स्वच्छता त्यांनी गुजरातमध्ये प्रखरपणे राबवून दाखवली असती तर त्याचे मॉडेल समोर आले असते. जोपर्यंत ते एका राज्याचेच मुख्यमंत्री होते तोपर्यंत त्यांना हा प्रश्न महत्वाचा वाटला नाही. आता पंतप्रधान झाल्यानंतर आपल्याला सगळे प्रश्न सोडवण्याचे अधिकार मिळाले आहेत किंवा आपण ते सोडवू शकतो, असा आत्मविश्वासही त्यांना वाटत असावा. समस्येचे मूळ कारण मनातली अस्वच्छता आणि खोटेपणाचा बडेजाव यामुळे निर्माण होतात. ही वस्तुस्थिती समजून घेतली आणि त्यावर उपाययोजना झाली तर सगळ्याच प्रकारची स्वच्छता राखणे सोपे जाऊ शकते.